दिनांक २२.११.२०१७ रोजी अवैध दारु विक्रि संबधात गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मा. महेंद्र पंडीत अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) गडचिरोली यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोलीस उप निरीक्षक युवराज घोडके, सोबतचे पथकातील अंकुशा धांडे, प्रदिप चवरे, अशा प्रकारचा पोलीस पथक पोलीस स्टेशन एटापल्ली अंतर्गत मौजा जिवनगट्टा ता. एटापल्ली येथे पोहचुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा जिवनगट्टा अवैध दारु विक्रेता नामे पोचु पांडु नरोटे याचे मालकिचे राहाते घरी अवैध दारु संबधाने घरझडती घेतली असता, त्याचे राहाते घरी त्याचे ताब्यातील खोलीचे एका कोप-यात विदेशी दारु अवैध विक्री करण्याचे उद्देशाने बाळगली असल्याचे मिळुन आली.

१. किमंत :- ७२,०००/- रुपये इपेरियल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या एकुन २४० सिलबंद बॉटल

२. किमंत :- २,५५,०००/- रुपये विदेशी मॅकडोल नबर १ कंपणीच्या विदेशी प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या ८५० सिलंबंद बॉटल

असा प्रकारे एकुण ३,२७,०००/- रुपयाचा मुद्देमालमाल घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला असुन यातील नमुद इसमांस अवैध दारु संबधात विचारणा केली असता, बेकायदेशिर रित्या मिळुन आलेला दारुचा साठा हा अवैध दारु पुरवठा करणारा नामे सुजल मंडल रा. चामोर्शी यांचे मालकिचा असुन सुनील नरोटे व राजु नरोटे असे सर्वजन मिळुन घरी बाळगुन असलेल्या दारुचे साठयावर नियंत्रण व देखरेख करुन अवेध दारु विक्रि करण्याकरीता ताब्यात बाळगुन असल्याचे मिळुन आल्याने यातील नमुद इसमां विरुध्द पोलीस स्टेशन एटापल्ली येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम ६५ (ई),८३, ८६(१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

